## प्रकरण - 9

### (नियम पुस्तिका - 8)

निर्णय घेण्याच्या कार्यपध्दतीची पध्दत

9.1 निरनिराळया घटनांमध्ये निर्णय घेण्याची कार्यपध्दती काय अनुसरलेली आहे? (शासकीय संहिता आणि व्यवसाय संहितेची नियमावली व नियम/नियमावली इत्यादींचा संदर्भ घेऊ शकतात).

सुधारणा करण्याचे प्राधान्य हे तीव्रता आणि हानी यांच्या पायावर ठरविले जाते आणि त्यानुसार निधीची तरतूद केली जाते आणि त्यासाठी प्रशासकीय मंजुरी, उपायुक्त (पायाभूत सुविधा) /अति.आयुक्त(पू.उप) या अधिका-यांची घेतली जाते. त्यानंतर अंदाजपत्रके तयार केली जातात, निविदा मागविल्या जातात आणि सर्वसाधारणपणे स्थायी समिती (निवडक नगरसेवकांचे मंडळ) लघुत्तम निविदेची शिफारस करुन कंत्राटदारांची नेमणूक करतात.

9.2 दस्तऐवजाची कार्यपध्दती/नियमानुसार कार्यपध्दती/कोणत्याही गुणांची पारख करण्याकरिता लावण्यात येणारी नेमकी कसोटी/निकष काय आहे? / विशेषकरुन महत्वाच्या घटनांमध्ये निर्णय घेण्याचे नियम काय आहेत? निर्णयाची हालचाल कोणत्या वेगवेगळया पातळीमध्ये उघड होते?

तांत्रिक विषयांचा अहवाल दुय्यम अभियंत्यांकडून सहाय्यक अभियंत्यांकडे तेथून कार्यकारी अभियंत्यांकडे, तेथून उप प्रमुख अभियंत्यांकडे व प्रमुख अभियंत्यांकडे व तेथून उपायुक्त (पायाभूत सुविधा) यांच्याकडे पाठविला जातो आणि अति.आयुक्त (प्रकल्प) हे तांत्रिक /प्रशासकीय/अर्थव्यवस्थेचे प्रमुख आहेत.

9.3 लोकांना निर्णय कळविण्याची काय व्यवस्था आहे?

काही नाही

9.4 निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत निरनिराळया पातळींवरील कोणत्या अधिका-यांची मते जाणून घेतात?

9.2 नुसार आणि प्रमुख लेखापाल आणि कायदा (विधी) अधिकारी यांच्या मते.

9.5 निर्णयांचे अंतिम अधिकारपत्र कोणाच्या हातात आहे ?

तांत्रिक विषयांबाबत उपायुक्त (पायाभूत सुविधा), प्रशासकीय आणि अर्थव्यवस्थेबाबत अति.आयुक्त (प्रकल्प) कंत्राटदारांची अंतिम नेमणूक करण्यासाठी स्थायी समिती आणि नगरपालिकेतील निवडलेली मंडळे.

अ) नियमित कामे / पुरवठाव्यतिरीक्त अन्य मसुदा निविदांची पडताळणी

i) लेखा अधिकारी

(संबंधित प्रस्ताव विभाग) … रु. 25 लाखा पर्यंत

ii) उप प्रमुख लेखाधिकारी (वित्त) … रु.50 लाखा पर्यंत

iii) प्रमुख लेखापाल (वित्त) … रु. 5 कोटीपेक्षा अधिक

ब) महापालिका चिटणीस यांना पाठविण्याचे मसुदापत्र / प्रस्तावाची छाननी

मुंबई महानगरपालिका अधिनियम 69 (क) अंतर्गत

i) उप प्रमुख लेखाधिकारी (वित्त) … रु. 10 कोटीपर्यंत

(आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम 72 (3) अंतर्गत महापालिका चिटणीस यांना पाठविण्याचे मसुदापत्र)

ii) प्रमुख लेखापाल (वित्त) … रु. 10 कोटीपेक्षा अधिक

(आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम 69(क) सोबत वाचावयाची 69(ई) अंतर्गत महापालिका चिटणीस यांना पाठविण्याचे मसुदापत्र)

कंत्राटदारांच्या अंतिम नेमणूकीकरीता स्थायी समिती आणि महानगरपालिका

9.6 ज्या महत्त्वाच्या बाबींवर सार्वजनिक प्राधिकरणामार्फत निर्णय घेण्यांत आले आहेत, अशांची माहिती कृपया खालील दर्शविलेल्या तक्त्यानुसार दयावी

| | | |
|---|---|---|
| | निर्णय घेण्यात येणारा विषय | करारनाम्याला अंतिम स्वरुप देणे |
| | मार्गदर्शक तत्वे/हुकुम जर असतील तर | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमांन्वये |
| | अंमलबजावणीची प्रक्रिया | सार्वजनिक जाहिरीतीद्वारे निविदा मागविण्यात येतात. |
| | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील अधिका-यांची करारनाम्याबद्दलची माहिती | संबंधित अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार |
| | जर निर्णयाबद्दल समाधानी नसल्यास कुठे आणि कसे आवाहन करावे | उपायुक्त (पायाभूत सुविधा)/ अति.आयुक्त (प्रकल्प) पत्रव्यवहाराद्वारे |